आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२१ डिसेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

●प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कुवेत दौऱ्यावर, गेल्या ४३ वर्षांमधली भारतीय प्रधानमंत्र्यांची पहिलीच कुवेत भेट

●विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून

●मंत्रिमंडळाचं खातेवाटप लवकरच जाहीर करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आश्वासन

**आणि**

●देशाच्या वन आणि वृक्ष आच्छादनात सुमारे दीड हजार चौरस किलोमीटरनं वाढ झाल्याचं वन स्थिती पाहणी अहवालात स्पष्ट

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी कुवेतला पोहोचले. कुवेतचे प्रथम उप-प्रधानमंत्री शेख फहाद युसुफ सौद अल सबाह यांच्यासह इतर मंत्र्यांनी मोदी यांचं विमानतळावर स्वागत केलं. गेल्या ४३ वर्षांमधली भारतीय प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच कुवेत भेट आहे. या भेटीमुळे दोन्ही देशातले संबंध अधिक दृढ होतील, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

मोदी यांच्या स्वागतासाठी कुवेतमधला भारतीय समुदाय उत्साहानं विमानतळावर जमला होता. यावेळी प्रधानमंत्र्यांनी १०१ वर्षांचे माजी परराष्ट्र सेवा अधिकारी मंगल सैन हांडा यांची तसंच रामायण आणि महाभारत महाकाव्याचं अरबी भाषेत भाषांतर करणारे अब्दुल्लाह अल बरौन यांची भेट घेतली. तसंच प्रधानमंत्र्यांनी कुवेतमधल्या भारतीय कामगारांची भेट घेतली.

भारत आणि कुवेत दरम्यान व्यापार आणि ऊर्जा क्षेत्रात मजबूत भागीदारी असून, पश्चिम आशियातली शांतता, सुरक्षा, स्थैर्य आणि समृद्धीसाठीही दोन्ही देश प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्र्यांनी या दौऱ्याला जाण्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली राजस्थानातल्या जैसलमेर इथं झालेल्या वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५५ व्या बैठकीची नुकतीच सांगता झाली. या बैठकीत वस्तू आणि सेवा कराशी निगडित मुद्द्यांबाबत तसंच कर आकारणीच्या दरांच्या टप्प्यांबाबत चर्चा झाली. या बैठकीला गोवा, हरियाणा, जम्मू आणि काश्मीर, मेघालय आणि ओदिशाचे मुख्यमंत्री, अरुणाचल प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि तेलंगणचे उपमुख्यमंत्री तसंच अन्य राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं नागपूर इथलं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. ३ मार्च २०२५ पासून विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या कामकाजाचा आढावा आज सभागृहासमोर मांडला.

**<><><><><>**

मंत्रिमंडळाचं खातेवाटप लवकरच जाहीर करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूर इथं हिवाळी अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर बातमीदारांशी बोलत होते. निवडणुकीनंतरचं हे अधिवेशन केवळ पुरवणी मागण्यांसाठी असतानाही, या अधिवेशनात शहरी नक्षलवाद आणि नक्षल संघटनांबाबतचं एक विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवलं आणि त्याशिवाय

इतर सतरा विधेयकं मंजूर केल्याचं त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री लाडकी योजना, बळीराजा योजना अशा योजना पुढे सुरूच ठेवण्यासाठी या पुरवणी मागण्या मध्ये तरतूद केली असल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड बाईट - फडणवीस......**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील यावेळी उपस्थित होते. महायुतीचं सरकार कापूस आणि सोयाबीनला हेक्टरी ५ हजार रुपये मदत देणार असल्याची माहिती त्यांनी दिली. शेतकऱ्यांना धानासाठी २० हजार रुपयांचा बोनस द्यायचा निर्णय या अधिवेशनात घेतला गेला असं त्यांनी सांगितलं. या अधिवेशनात जे मुद्दे सभागृहात मांडायला हवे होते ते विरोधकांनी मांडले नाहीत अशी टीकाही त्यांनी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ईशान्येकडे विशेष लक्ष केंद्रित केलं असल्याचं प्रतिपादन गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. ते त्रिपुराची राजधानी आगरतळा इथं ७२ व्या ईशान्य परिषदेला संबोधित करत होते. ईशान्येसाठी गेली दहा वर्षं खूप महत्त्वाची राहिली आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ईशान्य भारताच्या विकासाला प्राधान्य दिलं. इथं गुंतवणूक करण्यासाठी केंद्र सरकार गुंतवणुकदारांना उद्युक्त करत आहे. ईशान्येत प्रस्थापित झालेली शांतता ही एक मोठी कामगिरी आहे, असं शहा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांनी केंद्र सरकारच्या क्षयरोग निर्मूलनाच्या तीव्र मोहिमेच्या शंभराव्या दिवसाच्या पार्श्वभूमीवर आज देशभरातल्या सर्व राज्यांच्या तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्रांची बैठक घेतली.

क्षयरोग निर्मूलन मोहिमेसाठी सर्वतोपरी साह्य करण्याचं आवाहन नड्डा यांनी या बैठकीदरम्यान केलं.

<><><><>

देशाच्या वन आणि वृक्ष आच्छादनात एक हजार ४४५ चौरस किलोमीटरने वाढ झाली आहे. वन सर्वेक्षण विभागाने २०२३मधे केलेल्या वन स्थिती पाहणीचा अहवाल आज केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी प्रसिद्ध केला. त्यात म्हटलंय की सध्या एकूण ८ लाख २७ हजार ३५७ चौरस किलोमीटर क्षेत्र वन आणि वृक्षाच्छादित असून ते देशाच्या एकूण भूभागाच्या २५ पूर्णांक १ दशांश टक्के इतकं आहे. छत्तीसगड, उत्तरप्रदेश, ओदिशा, आणि राजस्थानात वनक्षेत्र वेगाने वाढलं असून मध्यप्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि महाराष्ट्रात अद्याप मोठी जंगलं टिकून आहेत. या आधीच्या पाहणीच्या तुलनेत झाडाझुडुपांच्या स्वरूपातला कार्बन साठा देखील ८कोटी १५ लाख टनांनी वाढला असून तो ७२८ कोटी ५५ लाख टनांच्या आसपास पोहोचला आहे.

<><><><>

सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त झालेले न्यायमूर्ती मदन लोकूर यांची संयुक्त राष्ट्रांच्या अंतर्गत न्यायमंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आहे. १२ नोव्हेंबर २०२८ पर्यंतची ४ वर्ष त्यांचा कार्यकाळ राहील. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंटोनियो गुटेरस यांनी न्यायमूर्ती लोकूर यांचं स्वागत केलं आहे. सर्वोच्च न्यायलयाचे न्यायाधीश म्हणून ६ वर्ष काम केल्यानंतर ३१ डिसेंबर २०१८ रोजी न्यायमूर्ती मदन लोकूर सेवानिवृत्त झाले होते.

<><><><>

राष्ट्रीय निवृती वेतन प्रणाली मध्यस्थ संघटनेचा आज अधिकृरित्या प्रारंभ झाला. मुंबईत भारतीय विमा संस्थेत आज सेक्युअरिंग टुमॉरो, विथ पेन्शन या विषयावर आयोजित परिषदेदरम्यान या संस्थेचा प्रारंभ केला गेला. यावेळी

निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. दीपक मोहंती यांच्या हस्ते संघटनेच्या बोधचिन्हाचे अनावरणही केले गेले. वित्तीय सुरक्षेच्या बाबतीत जागतिक उदाहरण म्हणून प्रस्थापित होण्याच्या अनुषंगाने ही संघटना आपले सदस्य आणि नियामकांच्या मार्गदर्शनानुसार नेतृत्व करेल, असा विश्वास डॉ. दीपक मोहंती यांनी यावेळी व्यक्त केला.

या ऐतिहासिक उपक्रमामुळे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणालीशी संबंधित परिसंस्थेतील सर्व प्रमुख भागधारकांना एका मंचावर आणणे शक्य झाले आहे, त्यांच्यामधले परस्पर सहकार्य वाढू शकणार आहे, तसेच निवृत्ती वेतन प्रणालीच्या लाभार्थी सदस्यांचे हीत जपण्याची व्यवस्था अधिक बळकट होऊ शकणार आहे, आणि त्याचबरोबर भारताच्या नागरिकांसाठी सेवा निवृत्ती नियोजनाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणालीच्या सातत्यपूर्ण विकासालाही चालना मिळू शकणार आहे.

**<><><><><>**

हरियाणाचे माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौटाला आज पंचतत्वात विलिन झाले. सिरसा जिल्ह्यातल्या तेजा खेडा इथं त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, त्यांच्या पत्नी सुदेश धनखड, मुख्यमंत्री नायाब सिंह सैनी, केंद्रीय मंत्री मनोहरलाल यांनी चौटाला यांना अंतिम निरोप दिला. खासदार कुमारी सेलजा आणि रणदीप सुरजेवाला हेही यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

पश्चिम भारत स्लॅम स्क्वॅश आशिया स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंहने महिला एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. अनाहतने उपांत्य फेरीत इजिप्तच्या नूर खाफगी हिचा ३-१, ११-४, १२-१४,११-९, ११-९ असा पराभव केला. अंतिम

फेरीत अनाहतचा सामना भारताच्याच आकांक्षा साळुंखे हिच्याशी उद्या होणार आहे. आकांक्षा साळुंखेने इजिप्तच्या जाना स्वैफी हिचा ११-५, १२-१४, १५-१३, ५-११, १२-१० असा पराभव केला.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये १९ वर्षांखालील टी ट्वेंटी आशिया चषक स्पर्धेचा अंतिम सामना उद्या  भारत आणि बांगलादेश यांच्यात होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी सात वाजता सामना सुरू होईल. सुपर फोर मध्ये काल श्रीलंकेचा पराभव करत भारतानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**//<><><><><>//**